महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address:** SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- २८/०२/२०२०

## नक्षलवाद्यांचा उत्तर गडचिरोली डीव्हिसीएम विलास कोल्हाचे एके-४७ सह गडचिरोली पोलीसांसमोर आत्मसमर्पण

→ **गडचिरोली जिल्हयाच्या इतिहासात प्रथमच डिव्हीसीचे शस्त्रासह आत्मसमर्पण**

→ **वरिष्ठ तेलगु नक्षलवाद्यांकडुन आदिवासींवर होणारे अन्याय अत्याचारामुळे आत्मसमर्पण.**

महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेली आत्मसमर्पण योजना, मागील वर्षभरात विविध चकमकीत माओवादयांचा झालेला खात्मा तसेच हिंसाचाराच्या जीवनाला कंटाळुन वरिष्ठ माओवादयांसह अनेक जहाल माओवादयांनी गेल्या वर्षभरात गडचिरोली पोलीस दलासमोर आत्मसमर्पण केलेले आहे. त्याच बरोबर आत्मसमर्पीत माओवादयांचे पोलीस दलाने पुनर्वसन घडवुन आणल्यामुळे माओवादी मोठया संख्येने आत्मसमर्पण करीत आहेत. नुकतेच एकुण ९ लाख ५० हजार रुपये बक्षीस असलेल्या नक्षलवादींचा उत्तर गडचिरोली जिल्हा सदस्यपदी कार्यरत असलेला **विलास ऊर्फ दसरु केये कोल्हा** वय- ४४ वर्ष रा. विकासपल्ली ता. एटापल्ली जिल्हा गडचिरोली याने गडचिरोली जिल्हा पोलीस अधीक्षक श्री शैलेश बलकवडे सा़ो. यांच्यासमोर **एके-४७ सह तीन मॅगजिन व ३५ राऊंडसह आत्मसमर्पण केले.**

विलास कोल्हा हा सन -२००० मध्ये एटापल्ली दलममध्ये भरती झाला होता. त्यानंतर जानेवारी २००३ पर्यंत कार्यरत राहुन फेब्रुवारी २००३ ला एटापल्ली दलममधुन बदली होवुन स्टाफ टिम डिव्हीसी विकास उत्तर डिव्हीजनमध्ये उप कमांडर म्हणुन डिसेंबर २००४ पर्यंत कार्यरत. माहे २००५ ला पदोन्नती देवुन टिपागड दलम कमांडर म्हणुन माहे- ऑक्टोबर २००७ पर्यंत कार्यरत. माहे नोव्हेंबर २००७ ला टिपागड दलममधुन बदली होवुन चातगाव दलम कमांडर म्हणुन ऑक्टोबर २००८ पर्यंत कार्यरत माहे नोव्हेंबर २००८ ला डिव्हीसी पदावर पदोन्नती, सन २०१० मध्ये टिपागड डिव्हीसी म्हणुन कार्यरत, माहे सप्टेंबर २०१० मध्ये कसनसुर डिव्हीसी म्हणुन कार्यरत, ऑक्टोबर २०१२ मध्ये चामोर्शी डिव्हीसी म्हणुन कार्यरत याव्यतिरिक्त त्याने गोंदिया जिल्हयातील दरेकसा डिव्हीसी, कोरची दलम डिव्हीसी, गेली चार महिन्यांपासुन तो चातगाव दलममध्ये डिव्हीसी म्हणुन कार्यरत होता. गडचिरोली जिल्ह्याच्या उत्तर भागात त्याने

लोकांमध्ये दहशत पसरविली होती. गडचिरोली पोलीस दलातील विविध पोस्टे, उपपोस्टे, पोमकें येथे **त्याचेवर असे तब्बल १४९ गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत.**

गडचिरोली पोलीस दल व केंद्रीय राखीव पोलीस दलाने मागील काही दिवसांपासुन नक्षलविरोधात राबविलेले आक्रमक नक्षलविरोधी अभियान, सी- ६० कमांडोने गेली वर्षभरापासुन नक्षलवाद्यांवर ठेवलेला अंकुश व नक्षलींचा केलेला खात्मा, वरिष्ठ तेलगु नक्षलवाद्यांकडुन आदिवासी नक्षलींचे होणारे शोषण, नक्षल संघटनेमध्ये तेलगु वरिष्ठ नक्षलवादी स्वत:चा करुन घेत असलेला आर्थिक फायदा, वरिष्ठ तेलगु नक्षलवाद्यांकडुन आदिवासी नक्षल महिलांचे होणारे शोषण. आदिवासी बांधवांची दिशाभूल करत त्यांना जल, जंगल व जमीनीचे खोटे स्वप्न दाखवित गेल्या अनेक वर्षापासुन आदिवासी समाजावरच नक्षलवादी करत असलेले अन्याय, अत्याचार व खून, सामान्य आदिवासी जनतेचा व येथील भागाच्या विकासासाठी प्रशासनाकडुन करण्यात येणाऱ्या कामांना नक्षलवाद्यांची आडकाठी या सर्व बाबींना कंटाळून आपण एके-४७ सह मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे साो. यांच्यासमोर आत्मसमर्पण करत असल्याचे विलास कोल्हाने सांगितले.

महाराष्ट्र शासनाने विलास कोल्हावर एकुण ८ लाख ५० हजाराचे बक्षीस जाहीर केले होते. विलास कोल्हा याने एके-४७ रायफलसह ३ मॅगजिन व ३५ राऊंडसह आत्मसमर्पण केले आहे. त्याला शासनातर्फे आणखी १ लाख रूपयाचे बक्षीस देण्यात येणार आहे.

गडचिरोली पोलीस दलाची वर्षभरापासुनची सातत्यपुर्ण प्रभावी कामगिरी तसेच आदिवासी समाजाच्या विकासाप्रती असलेली बांधिलकी जपत गडचिरोली पोलीस दलाने आदिवासी समाजाच्या प्रत्येक घटकासाठी अंमलात आणलेल्या विविध योजना व यामुळे नक्षलवाद्यांना जनसामान्यांकडून होणारा विरोध, यामुळे गडचिरोली पोलीस दलासमोर इतिहासात पहिल्यांदाच संपुर्ण चातगाव दलमने नुकतेच आत्मसमर्पण केले होते. त्याचबरोबर गेल्या वर्षभरापासुन विलास कोल्हासह ४ डिव्हीजनल कमिटी मेंबर, २ कमांडर, २ डेप्युटी कमांडर, २६ दलम/कंपनी/प्लाटुन सदस्य व १ जनमिलीशीयाने मागील एका वर्षात गडचिरोली पोलीस दलासमोर आत्मसमर्पण केले आहे.

नक्षलमधील इतर माओवादी यांनी देखील हिंसाचाराचा मार्ग सोडुन आपणच आपल्या आदिवासी बांधवांवर करत असलेले अनन्वित अत्याचार थांबवुन आपल्या भागाचा देखील इतर उन्नत समाजाप्रमाणे विकास व्हावा. या दृष्टीने विकासाच्या मुळ प्रवाहात येण्यासाठी आत्मसमर्पण योजनेचा फायदा घ्यावा असे आवाहन मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे साो. यांनी केली आहे.



GADCHIROLI POLICE
वीर भोग्या वसुंधरा
FORTUNE FAVOURS THE BRAVE